# राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रधान सचिव (परिवहन) तथा अध्यक्ष, राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे मंत्रालयातील कार्यालयीन दालनात दिनांक १९.०९.२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, यांच्या २६८ व्या बैठकीचे इतिवृत्त पुढे नमुद केल्याप्रमाणे आहे :

सदर बैठकीस राज्य परिवहन प्राधिकरणाचे पुढे नमुद केल्याप्रमाणे अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. आशिष कुमार सिंह, भा.प्र.से.<br>प्रधान सचिव (परिवहन),<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई | अध्यक्ष,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |
| २. | श्री. शेखर चन्ने, भा.प्र.से.<br>परिवहन आयुक्त,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |
| ३. | श्री. विनय कारगांवकर, भा.पो.से..<br>अपर पोलिस महासंचालक (वाहतुक),<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |
| ४. | श्री. स. बा. सहस्त्रबुध्दे<br>अपर परिवहन आयुक्त,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सचिव,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |

**बाब क्र. १**

**विषय :- दिनांक १४.०८.२०१९ रोजी संपन्न झालेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या २६७ व्या बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देण्याबाबत.**

दिनांक १४.०८.२०१९ रोजी घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरणाच्या २६७ व्या बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देऊन सदर इतिवृत्त प्राधिकरणाने कायम केले.

**बाब क्र. २**

**विषय :- दिनांक १४.०८.२०१९ रोजी संपन्न झालेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या २६७ व्या बैठकीतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीचा आढावा घेण्याबाबत.**

राज्य परिवहन प्राधिकरणाने दिनांक १४.०८.२०१९ रोजी घेण्यात आलेल्या प्राधिकरणाच्या २६७ व्या बैठकीतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीचा आढावा घेतला.



Scanned by CamScanner

(दिनांक १९.०९.२०१९ रोजी झालेल्या रा.प.प्रा. च्या २६८ च्या बैठकीचे इतिवृत्त)

**बाब क्रमांक :- ०३**

**विषय:- राज्यातील ऑटोरिक्षा यांची वयोमर्यादा निश्चित करणेबाबत**

राज्य परिवहन प्राधिकरणाने विषयसूचीचे अवलोकन केले

मा. खटुआ समितीने राज्यातील ऑटोरिक्षा व टॅक्सीचे भाडे दरवाढ करणेबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे. त्यामध्ये आटोरिक्षाची वयोमर्यादा निश्चित करणेबाबत नमुद करण्यात आलेल्या शिफारसींची अंमलबजावणी केल्यास होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी अधिक सखोल चर्चा करणे आवश्यक असल्याचे मत प्राधिकरणाने नोंदविले.

सदर विषयांकित बाबीबाबत राज्यातील येत्या विधानसभा निवडणूकीनंतर राज्य परिवहन प्राधिकरणास प्रस्ताव परत सादर करावा असे प्राधिकरणाने निर्देश दिले.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक १९.०९.२०१९ ठराव क्र.२५/२०१९)**

**स.बा.सहस्त्रबुध्दे**
**सचिव,**
**राज्य परिवहन प्राधिकरण**
**तथा अपर परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**श्री शेखर चन्ने, (भा.प्र.से)**
**सदस्य,**
**राज्य परिवहन प्राधिकरण,**
**तथा परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**श्री. विनय कारगांवकर, (भा.पो.से.)**
**सदस्य,**
**राज्य परिवहन प्राधिकरण**
**तथा अपर पोलीस महासंचालक (वाहतूक),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**श्री. आशिष कुमार सिंह, (भा.प्र.से)**
**अध्यक्ष,**
**राज्य परिवहन प्राधिकरण,**
**तथा प्रधान सचिव, गृह विभाग (परिवहन),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

E:\Minuts 268.docx2

Scanned by CamScanner